# CURRICULUM
# MARATHI
# (009)
# IX
# 2025-26

अभ्यासक्रम प्रारुप –इयत्ता नववी, दहावी **(009)**

प्रस्तावना –

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाला मिळालेली ती अमूल्य अशी देणगी आहे. आत्मसंवाद व परसंवाद साधण्याचे ते एक प्रभावी साधन आहे की जे आपण लिखित किंवा मौखिक स्वरुपात व्यक्त करु शकतो. संवाद साधण्यासाठी लिहिणे, वाचणे, बोलणे, इशारे, हावभाव , मूक अभिनय, मुद्राभाव अशी अनेक माध्यमे आहेत. परंतु भाषा हे अतिशय प्रभावी साधन आहे. भाषा हे आपले विचार मते,भावना आणि जाणिवा प्रगट करण्याचे एक साधन आहे. ती भाषा कोणतेही असो मातृभाषा असो अथवा इतर भाषा असो. व्यक्तीच्या ‘व्यक्त होणे’ या स्थायीभावासाठी ती उपयुक्त आहे.भाषेच्या विकासाच्या अनेक पायऱ्यापैकी आकलन,शब्दसंग्रह वाढविणे, वाक्यरचना,शब्दोच्चारण हे चार प्रमुख टप्पे आहेत. व्यक्तीच्या विकासानुसार त्याचे स्तर उंचावत जातात.

‘मराठी’महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा आहे. यास्तव ती आपणास अवगत असणे गरजेचे आहे. देवगिरीच्या यादवांच्या काळात उदयास आलेल्या या भाषेत महानुभव व वारकरी संप्रदायापासून आजतागायत अनेक तत्ववेत्यांनी,साहित्यिकांनी ती वाढविण्याची तिचे संवर्धन करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. मराठी भाषेतील वा.डमयाला प्रदीर्घ परंपरा आहे. लिखित वाड.मयाबरोबर लोक वाड.मयाची परंपरा आहे.

‘माझा मराठीचि बोलु कौतुकें |परि अमृतातेहीं पैजासीं जिंके |

ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन| ‘अशी प्रतिज्ञां संत ज्ञानेश्वरांनी केली आणि ती तडीस नेली. ‘ विवेकसिंधु’ हा ग्रंथ लिहिणारे आद्य कवी मुकुंदराज,‘ ज्ञानेश्वरी’,‘अमृतानुभव’,‘चांगदेव पासष्टी’ असे ग्रंथ लिहिणारे श्री संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा संपन्न केली.

‘ मराठी असे आमुची मायबोली’ असे प्रत्येक माणसाने अभिमानाने म्हटले पाहिजे. मराठीतून बोलणे, मराठीतून पत्रव्यवहार करणे, मराठी वृत्तपत्रे व ग्रंथाचे वाचन करणे हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी असलेल्या या महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत.

२७ फेब्रुवारी हा जेष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस ‘ जागतिक मराठी भाषा दिन’ म्हणून साजरा केला जातो. श्रवण कौशल्य म्हणजे ऐकणे, भाषण संभाषण कौशल्य म्हणजे बोलणे,वाचन कौशल्य म्हणजे आपल्यासमोरील मजकूर वाचणे, लेखन कौशल्य म्हणजे सुंदर सुवाच्च अक्षरात लिहिणे अशा सर्व कौशल्यांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी मराठी भाषा शिक्षण महत्वाचे आहे.

‘ लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म,पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी’

अशा सुंदर शब्दात कवी सुरेश भट यांनी माय मराठीचे वर्णन केले आहे. इ.स.१९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंघ महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला. अशा या भाषेत आपले विचार,मते,कल्पना,भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडता याव्यात,भाषेवर प्रभुत्व हवे.भाषेचा विविध प्रकारे वापर करणे यास्तव विविध साहित्य प्रकाराचा समावेश प्रस्तुत प्रारुपात करण्यात आला आहे. या सर्व साहित्यप्रकारांतील आशय

आणि भाषा यांमधील वैविध्य मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे हे लक्षात आणून देईल. जीवनमूल्ये, जीवन कौशल्य विकसित होण्यासाठी या साहित्यकृतीची मदत होईलच, परंतु त्याबरोबर विचारक्षमता ,अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशिलता यांच्या विकासासाठी उपयुक्त होईल.

उद्दिष्टे

| क्षमता क्षेत्रे | क्षमता विधान |
|---|---|
| श्रवण | १.विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद ऐकून त्यांमधील सत्यता पडताळून पाहून त्याबाबत स्वतःचे मत निश्चित करता येणे.<br>२.सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनानुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३.औपचारिक व अनचौपचारिक संवाद व संभाषण ऐकूण आपले विचार मांडता येणे.<br>४. विविध साहित्यांतील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात , आरोह – अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६.परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण – संभाषण | १.विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२.विषयानुरुप स्वतःचे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन,आयोजन करुन त्यांत सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. प्रभावी भाषण – संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यांचा योग्य वापर करता येणे. |
| वाचन | १. योग्य गतीने विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करुन त्याचा आस्वाद घेता येणे.<br>३. संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या इ-साहित्याचे वाचन करुन आस्वाद घेता येणे.<br>४. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करुन , त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>५. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना व माहिती चिकित्सकपणे वाचून पडताळून पाहता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुध्दलेखनाच्या नियमाचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचा,कल्पनांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वतःच्या विचारांची ,कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी,वाक्प्रचार,शब्दसमूह, सुभाषिते यांचा लेखनात प्रभावीपणे वापर करता येणे.<br>५. घटना, प्रसंग , स्वानुभव यांचे लेखन करता येणे.<br>६. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

# Marathi Curriculum (2025-26)

इयत्ता नववी

**CLASS – IX – (CODE -009)**

| अ.क्र | पाठाचे नाव | लेखक/ कवीचे नाव |
|---|---|---|
| १ | सर्वात्मका शिव सुंदरा ( प्रार्थना )(केवळ वाचनासाठी) | कुसुमाग्रज |
| २ | संतवाणी - अ. संत कृपा झाली | संत बहिणाबाई |
| ३ | बेटा मी ऐकतो आहे. | व.पु.काळे |
| ४ | जी.आय.पी रेल्वे | प्रबोधनकार ठाकरे |
| ५ | व्यायामाचे महत्व | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| ६ | ऑलिंपिक वर्तुळाचा गोफ | बाळ ज. पंडित |
| ७ | दिव्याच्या शोधामागचे दिव्य | डॉ. अनिल गोडबोले |
| ९ | उजाड उघडे माळरानही | ललिता गादगे |
| १० | कुलूप | श्री. कृ. कोल्हटकर |
| ११ | आभाळातल्या पाऊलवाटा | |
| १२ | पुन्हा एकदा | प्रतिमा इंगोले |
| १३ | तिफन ( कविता) | विठ्ठल वाघ |
| १५ | माझे शिक्षक आणि संस्कार | शंकरराव खरात |
| १६ | शब्दांचा खेळ | हेलन केलर |
| | स्थूलवाचन | |
| १ | व्हेनिस | रमेश मंत्री |
| २ | विश्वकोश | |
| | व्याकरण :<br>➢ शब्दांच्या आठ जाती<br>➢ लिंग,वचन<br>➢ काळ,वाक्याचे प्रकार-आज्ञार्थी,विधानार्थी,उद्गारवाचक ,प्रश्नार्थक<br>➢ समानार्थी, विरुध्दार्थी शब्द<br>➢ समास-द्विगू, द्वंद्व-३ प्रकार,अव्ययीभाव. | |
| | वाचन व आकलन :<br>➢ एक अपठित गद्यांश (परिच्छेद)अंदाजे (**150 -200** शब्द) बहुपर्यायी , लघुत्तरी<br>➢ एक अपठित पद्यांश(कविता) अदांजे (**10 -12** ओळी) बहुपर्यायी , लघुत्तरी | |
| | लेखन :<br>➢ निबंध : आत्मवृत्त, कल्पनात्मक, वर्णनात्मक<br>किंवा<br>➢ मुद्दयांवर आधारित गोष्ट ( कथा)<br>➢ औपचारिक पत्र - मागणी , तक्रार (लिफाफा आवश्यक)<br>➢ जाहिरात लेखन | |

Textbook Prescribed - अक्षरभारती इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४